पश्चिम विदर्भात सर्वाधिक प्रसारित दैनिक

Email: rajyonnati@gmail.com

राज्योन्नती

# जवाहर नवोदय विद्यालयात सायबर सुरक्षा विषयावर कार्यशाळा

**प्रतिनिधी/ १८ ऑक्टोबर**

**अकोला :** जवाहर नवोदय विद्यालय बाभुळगाव ( जहांगीर ) येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेत शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स साक्षी शिरसाट आणि वैष्णवी पाटील यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इनरनेट च्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्हे झपाट्याने कसे वाढत आहेत या विषयी माहिती सांगितली. मोबाईलचा अती वापर टाळावा, सतत मोबाईल गेम्स खेळल्या मुळे कसे वाईट परिणाम होतात, व्हॉट्स?प, इंस्टा, फेसबुक आणि फेक वेबसाइट्सच्या माध्यमातून कशी फसवणूक होते आणि या पासून आपण कसे सुरक्षित राहावे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मोबाईल वापरताना २ स्टेप व्हेरिफिकेशन



करावे, सेक्युरीटी सर्टिफिकेट ( ) असलेल्याच वेबसाईटला विझिट करावे, सोशल मेडीयाचा सुरक्षितपणे कसा वापर करावा याविषयीच्या सुरक्षा टिप्स विद्यार्थ्यांना सांगितल्या. कार्यशाळेत विद्यार्थांनी विविध प्रश्न विचारून उत्स्पूर्त सहभाग नोंदवला. यावेळी मोबाईल आणि इंटरनेटचा योग्य पद्धतीने करण्यासाठी विध्यार्थ्यांना शपथ देण्यात आली आणि सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रक वाटप करण्यात आले. ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला चे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू , समन्वयक डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली, 'क्विक हिल फाउंडेशन, पुणे' आणि 'महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई' यांच्या सहयोगाने आणि जे.एन.व्ही. चे प्राचार्य रवींद्र चंदनशिव, उपप्राचार्य श्रीमती कविता चव्हाण यांच्या परवानगीने आयोजित केली होती. या कार्यशाळेमध्ये, श्रीमती कविता चव्हाण, श्री डब्लू. एन. पाटील, श्री ए. जी. सुतार, श्री श्रीकृष्ण लाल, श्री ए. पी. गेडाम, श्री अरुण तायडे आणि इतर शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उपस्थित राहून कार्यशाळा यशस्वी केली. यावेळी डॉ. हरिदास खरात, सानिका बाघमारे, प्रणाली दवणे उपस्थित होते. उपप्राचार्य श्रीमती कविता चव्हाण यांनी ऑनलाईन गुंन्ह्यांचे वाढते स्वरूप कमी करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

Mumbai Edition
Oct, 19 2023 Page No, 3
https://epaper.dainikrajyonnati.com